# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कोडोली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0167 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/05/2024 19:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 12/12/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/12/2023
   **Time From (वेळेपासून):** 13:55 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 23:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/05/2024 **Time (वेळ):** 11:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 041

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/05/2024 19:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वक्रतुंड मोटर्स जवळ, कोडोली,पन्हाळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीमती आसमा बाबासो मुल्ला

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अन्टी करप्शन ब्युरो, ,कोल्हापुर,करवीर,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अन्टी करप्शन ब्युरो, ,कोल्हापुर,करवीर,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभिजीत नारायण पवार | | | 1. नारायण फ्लट नं2, हाटेल व्हिक्टर पलेसजवळ, कोल्हापुर, करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रणजित आनंदराव पाटील | | | 1. गणपती मंदिरजवळ,,कोडोली, पन्हाळा,कोडोली,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब तारीख 31/05/2024

मी आसमा बाबासो मुल्ला वय 38 वर्षे ,पोलीस निरीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर सरकार तर्फे फिर्याद देते की,

मी दि.18/10/2023 रोजी पासून अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे. दि.12/12/2023 रोजी 13.00 वा.मी कार्यालयात हजर असताना पोलीस उपअधीक्षक श्री सरदार नाळे यांनी आंम्हाला त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेवून तक्रारदार ईस्माइल पटेल रा.कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर यांची लाच मागणी संदर्भात तक्रार असलेबाबत सविस्तर हकीकत सांगून तक्रारदार यांचेशी संपर्क करून पुढील कारवाई करणेबाबत मुखशिल आदेश दिला.

त्याप्रमाणे आंम्ही तक्रारदार ईस्माईल पटेल यांचे तक्रारीप्रमाणे ब्युरोच्या कार्यप्रणालीनुसार कारवाई करणेसाठी आम्ही शासकीय पंच उपलब्ध करून तक्रारदार श्री ईस्माईल पटेल यांना तक्रारी अर्ज घेवुन वारणा कोडोली येथे येण्यास सांगून त्यांचा तक्रार अर्ज वाचून पाहिला.त्यातील थोडक्यात मजकूर खालीलप्रमाणे,
मी वरील पत्यावर माझी मावशी व त्यांचे पती करीम वजीर मुंडे असे एकत्रीत राहणेस आहे.माझे काका करीम मुंडे यांनी अशोक गायकवाड वगैरे रा.कोडोली ता.पन्हाळा यांचे मालकीची माले ता.पन्हाळा गट नं.1699 येथील 2 गुंठे शेतजमीन दि.24/11/2023 रोजी खरेदी केलेली आहे.

माझे काका वयस्कर असून ते आजारी असल्यामुळे त्यांनी सदर खरेदी दस्तावरून त्यांचे नांव 7/12 उता-यास नोंद होवून उतारा मिळणेकरीताचा अर्ज माझ्याकडे देवून तो अर्ज तलाठी कार्यालय माले येथे देणेसाठी दिलेला होता. त्याप्रमाणे मी दि.30/11/2023 रोजी तेथे गेलो आणि तलाठी किशोर पाटील यांना भेटलो.त्यावेळी किशोर पाटील यांनी नाव लावण्याकरीता 25,000 रू.ची मागणी केली व माझा अर्ज परत माझ्याकडे दिला.त्यानंतर मी सदरचा अर्ज घेवून कोडोली येथील सर्कल अभिजीत पवार यांचेकडे गेलो.त्यावेळी त्यांनीही 7/12 उता-यास नाव लावण्याकरीता 25,000 रू.ची मागणी केली व माझेेकडून अर्ज न घेता मला परत पाठविले. मी सर्कल आॅफिसच्या बाहेर असताना आमच्या गावातील रणजीत पाटील हा माझ्याकडे आला आणि म्हणाला की, मला सर्कल पवार साहेबांनी तुझ्या कामाबद्दल बोलेले आहेत.मी तुझे काम करून देतो त्यांनी सांगितलेप्रमाणे 25,000 रू.माझेकडे आणून दे..मी तुला 7/12 उतारा देतो असे म्हणाले.त्यावेळी मी रणजीत पाटील यांना माझेकडे अगर काकाकडे ऐवढे पैसे नाहीत असे म्हणालो व काहीतरी कमी करायला सांगा असे म्हणालो.परंतु त्यांनी नकार दिला. त्यानंतर दि.06/12/2023 रोजी मी रणजीत पाटील यांना भेटलो त्यावेळी त्यांनी माझ्या कामाकरीता 20,000 रू.दे 7/12 उता-यास नांव लावून देतो असे म्हणाले व तुझा अर्ज न घेता सर्कल पवार आणि तलाठी किशोर पाटील यांचेकडून काका करीम मुंडे यांचे नांव लावून 7/12 उतारा देतो दोन दिवसांमध्ये 20,000 रू.ची जुळणा कर... असे सांगितले.त्यावेळी मी ठीक आहे असे सांगून आलो.त्यानंतर रणजीत पाटील हा मला फोन करून वारंवार पैशाबाबत विचारणा करू लागला होता.परंतु तलाठी किशोर पाटील, सर्कल अभिजीत पवार यांचेकरीता रणजीत पाटील मागत असलेले 20,000 रू.ही लाच असल्याची खात्री झाली.त्यानंतर मी माझे काका करीम मुंडे यांचेसोबत घडले प्रकाराबाबत चर्चा केली.त्यावेळी काका करीम मुंडे यांची त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तलाठी पाटील, सर्कल पवार व रणजीत पाटील यांचे विरूध्द अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तक्रार अर्ज देणेकामी मला संमतीपत्र दिले असून त्याप्रमाणे मी सदरचा तक्रारी अर्ज दिलेला आहे.मला मराठी लिहीता वाचता येत नसल्याने मी माझा तक्रारी अर्ज माझी मुलगी कु.आयेशा पटेल हिच्याकडून लिहून घेतला आहे.तरी आपलेकडून योग्य कायदेशीर कारवाई व्हावी.

दि.12/12/2023 रोजी तक्रारदार श्री पटेल यांचे वरील तक्रारीचे अनुषंगाने लोकसेवक तलाठी किशोर पाटील सज्जा माले ता.पन्हाळा जि.कोल्हापूर हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची खात्री करण्यासाठी तक्रारदारा सोबत पंचास तलाठी कार्यालय माले येथे पाठवून दिले त्यावेळी तलाठी पाटील यांची भेट झाली नसल्याने तक्रारदार

पटेल यांनी त्यांचा मोबाईल नंबर 7057944400 यावरून तलाठी किशोर पाटील यांचे मोबाईल नं. 9518312164 यावर फोन केला त्यावेळी तलाठी पाटील यांनी फोन घेतला व हॅलो हॅलो करून कट केला. त्यानंतर तक्रारदार पटेल परत येत असताना तक्रारदार यांचे वरील मोबाईलवर खाजगी इसम रणजीत उर्फ आप्पा पाटील यांनी त्यांचा मोबाईल नंबर 9850555500 यावरून फोन केला .त्यावेळी तक्रारदार यांनी तलाठी किशोर पाटील हे फोन उचलना त्यो असे म्हणाले त्यावर रणजीत पाटील यांनी त्यो कसा उचलल तुझा डायरेक्ट फोन, आता मी सांगितलं बाबा माझ मी करतो, तुम्ही दया माझ्याकडं मी... आईला अवघड हाय बाबा काम, तसे पैसे घेत नसल्यात र आता अविश्वास झाल्याला हाय ना तुझ्या पुढं असे म्हणाले. तक्रारदार पटेल यांना वक्रतुंड मोटर्स शोरूमवर कोडोली येथे भेटण्यास बोलविले असल्याचे निष्पन्न झालेने तक्रारदार पटेल यांना खाजगी इसम पाटील यांची भेट घेण्यास पंच यांचे सह पाठवून देवून पडताळणी करण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे तक्रारदार ईस्माईल पटेल यांना पंचासह खाजगी इसम पाटील यांचेकडे पाठवून देवून पडताळणी केली. त्यावेळी खाजगी इसम  पाटील यांना तक्रारदार पटेल यांनी त्यांचे कामाचे बाबत चर्चा करून किती म्हणतोय फायनल किती असे विचारले त्यावर पाटील यांनी सांगितलं नव्हं का तुला आता वीस तर, विषय नाही तेज्या पुढं तर आणि मागं काय आणि हिकडं काय मला गणितच कळना तुझ असे म्हणाले त्यावर तक्रारदार पटेल यांनी फायनल वीसच म्हणतोय तो काय कमी जरा कर की म्हणावं त्यावर रणजीत पाटील यांनी पैसे असं परत घिवून येत्यात व्हय , अधिका-यांच्या कडनं असं पैसे मागं घेत्यात व्हय असे म्हणून तक्रारदार पटेल यांचेकडे मंडल अधिकारी अभिजीत पवार व तलाठी किशोर पाटील यंाचेकरीता लाचेची मागणी करून ती रक्कम स्वतःकडे देण्यास सांगून मंडल अधिकारी पवार व तलाठी पाटील यांना मदत करण्याचे उद्देशाने तक्रारदार यांना अपप्रेरणा देवून उत्तेजन दिल्याचे निष्पन्न झाले.परंतु खाजगी इसम पाटील हे मागणी करत असलेल्या लाच रक्कमेबाबत निश्चित रक्कम स्पष्ट होत नसल्याने पुन्हा त्यंाची पडताळणी करण्याचे ठरविले.

त्यानंतर दि.13/12/2023 रोजी तक्रारदार पटेल हे पंचासह खाजगी इसम पाटील यांची भेट घेण्यास पाठवून पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचेशी खाजगी इसम पाटील यांनी बोलताना आरं व्हयं की मग तसं नसतयं र एकदा डन झालं की त्यात आता साहेब वीस नाही पंधरा करतो आसं म्हणुन चालतय का सांग मला... असे म्हणाले त्यावर तक्रारदार पटेल यांनी  आता हे आणि सुपारी घेतलीया व्हय मग वीस हजार मध्ये त्यो डन हाय... असे विचारले त्यावर रणजीत पाटील यांनी व्हयं असे म्हणून होकार दिला.त्यावर तक्रारदार पटेल यांनी  तेजं हयो बघा वीस हजार म्हणलाय त्यो तलाठयाचं आणि सर्कलचं एकत्र असे विचारले त्यावर रणजीत पाटील हु... दे म्हणाव चाट दिषान तरं... असे म्हणून लाचेची मागणी केली.त्यावर तक्रारदार पटेल यांनी तुमच्याकडं असे विचारले त्यावर रणजीत पाटील यांनी हा... दे माझ्याकडं तुझ्याकडनं घेणार पण नाहीत ती... पैसे आणि काय सांगु... असे म्हणाले यावरून व इतर झालेल्या संभाषणावरून खाजगी इसम पाटील यांनी मंडल अधिकारी अभिजीत पवार व तलाठी किशोर पाटील यांचेकरीता 20,000 रू. लाचेची मागणी करून ती रक्कम स्वतःकडे देण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार पटेल यांनी त्यांचे मोबाईलवरून मंडल अधिकारी अभिजीत पवार यांचे मोबाईल नं. 9970170701 यावर फोन केला असता मंडल अधिकारी यांनी ते कोल्हापूर येथे असल्याचे सांगून तेथे भेटण्यास बोलविले. त्यानंतर आंम्ही तक्रारदार पटेल यांना पंचासह मंडल अधिकारी अभिजीत पवार यांची भेट घेण्यास पाठवून पडताळणी केली.त्यावेळी तक्रारदार पटेल व अभिजीत पवार यांची तोरस्कर चैक,कोल्हापूर येथे समक्ष भेट झाली. त्यावेळी तक्रारदार पटेल यांनी खाजगी इसम पाटील यांचेशी झालेल्या बोलण्याबाबत चर्चा केली.व तक्रारदार यांचे काका करीम मुंडे यंाचे 7/12 उता-यावर नांव लावून देण्याकरीता रणजीत पाटील यांनी 20,000 रू.सांगितले आहेत. फक्त हेच आता ऐवढं व्हय तेज्यात काय तलाठी किशोर पाटील नंतरन खोट काढणार नाही नव्ह... का? असे विचारले त्यावर सर्कल पवार यांनी अरे बाबा मी काय कधी कुणाला डावलुन काय करत नाही... बाबा असे म्हणून रणजीत पाटील यांनी केलेल्या 20,000 रू.लाच मागणीस संमती दिली. त्यानंतर तक्रारदार पटेल यांनी त्यात काहीतरी कमी करा असे म्हणाले त्यावेळी मंडल अधिकारी अभिजीत पवार यांनी तुझी काय इच्छा हाय सांग... असे विचारलेवर तक्रारदार पटेल यांनी पंधरा... असे विचारलेवर एस... असे म्हणून मान हालवून होकार दिला.त्यावेळी तक्रारदार पटेल यांनी रणजीत पाटील यांचे वरील फोनवर फोन केला व अभिजीत पवार साहेबांनी 15,000 रू. सांगितले असल्याचे सांगितले व त्यांना अभिजीत पवार यांचेशी बोला असे सांगितले होते.त्यानंतर तक्रारदार पटेल यांनी मंडल अधिकारी अभिजीत पवार यांना तुमच्याकडं द्यायचा का असे विचारलेवर मंडल अधिकारी अभिजीत पवार यांनी नाही... नाही तेच्यांकडं दिलं तर चालतय... ,रणजीत आप्पांकडं दे तु... असे म्हणाले.यावरून मंडल अधिकारी अभिजीत पवार यांनी खाजगी इसम पाटील यांनी सांगिलेल्या लाच रक्कमेमध्ये तडजोड करून त्यंाचेकरीता व तलाठी पाटील यांचेकरीता 15,000 रू.लाचेची मागणी केल्याचे व सदरची लाच रक्कम खाजगी

इसम पाटील यांचेकडे देण्यास सांगितले असल्याचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले.

मंडल अधिकारी पवार यांनी 15,000 रू.लाच रक्कम मागणी केली व त्यामध्ये तलाठी किशोर पाटील यांचा देखील सहभाग असल्याचे दिसून आलेमुळे दि.20/12/2023 रोजी तलाठी किशोर पाटील यांची पडताळणी केली असता तलाठी पाटील यांची भेट झाली नाही तसेच तलाठयांचा फोन बंद असल्याने त्यंाचेशी संपर्क झाला नाही . दि.28.12.2023 रोजी तलाठी किशोर पाटील यांची पुन्हा पडताळणी केली त्यामध्ये तक्रारदार पटेल व तलाठी पाटील यांची तलाठी कार्यालय माले येथे भेट झाली तेव्हा तलाठी किशोर पाटील हे घाबरले आणि त्यांनी तक्रारदार यांचेशी बोलणे टाळून ते तक्रारदार यांना बसा बसा असे म्हणून कार्यालयामधून बाहेर येवून त्यांचे गाडीवरून निघून गेले.त्या परिस्थीतीमुळे तक्रारदार पटेल यांचेकडे तलाठी किशोर पाटील हे लाचेची मागणी करणार नाहीत असे तक्रारदार यांनी सांगितलेने तक्रारदार ईस्माईल पटेल यांना सापळा कारवाईचे आयोजन करत असलेबाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी आपण थोडे बाहेरगांवी जाणार असून मी परत आलेनंतर आपणास फोन करतो त्यानंतर पुढील कारवाई करू असे सांगितले होते.

त्यानंतर यातील तक्रारदार ईस्माईल पटेल यांना त्यांचे दुबई येथील नोकरीवर तात्काळ हजर होणेबाबत कळविल्याने ते निघून गेले असल्याचे व त्यांना परत येण्यास वेळ लागणार असल्याचे त्यांच्या आई श्रीमती बानू अमिन पटेल यांचेकडे केले चैकशी मध्ये त्यांनी सांगितले असून तसा त्यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे.

तरी तक्रारदार श्री ईस्माईल पटेल यांचे काका करीम मंुडे यांनी माले ता.पन्हाळा गट नं.1699 येथील 2 गुंठे खरेदी केलेल्या मिळकतीचे 7/12 उता-यावर करीम मुंडे यांचे नांव नोंद करून 7/12 उतारा देण्याकरीता खाजगी इसम रणजीत उर्फ आप्पा आनंदराव पाटील यंानी लोकसेवक अभिजीत पवार मंडल अधिकारी,कोडोली व लोकसेवक किशोर पाटील,तलाठी सजा माले यांना जाणीवपुर्वक मदत करण्याचे उद्देशाने व तक्रारदार यांना प्रोत्साहीत करून मंडल अधिकारी पवार व तलाठी पाटील यंाचेकरीता 20,000 रू.लाचेची मागणी करून सदरची रक्कम तुझ्याकडून घेणार नाहीत ,माझेकडे दे असे म्हणून तक्रारदार पटेल यांना अपप्रेरणा देवून लाच देण्यास उत्तेजन दिलेने तसेच मंडल अधिकारी अभिजीत पवार यांनी तक्रारदार पटेल यांचे वरील कामाकरीता खाजगी इसम रणजीतपाटील यांनी मागणी केलेल्या 20,000 रू.लाच रक्कमेमध्ये तडजोड करून स्वतःसाठी तसेच तलाठी किशोर पाटील यांचेकरीता 15,000 रू.लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम खाजगी इसम रणजीतउर्फ आप्पा पाटील यांचेकडे देण्यास सांगितलेचे निष्पन्न झालेने तक्रारदार हे दुबई येथे परदेशी गेल व ते परत केव्हा येतील याबाबत निश्चिती नसल्याने माझी लोकसेवक अभिजीत नारायण पवार,(मंडल अधिकारी)कोडोली ता. पन्हाळा जि.कोल्हापूर व खाजगी इसम रणजीत उर्फ आप्पा आनंदराव पाटील वय 48 वर्षे रा.कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर यंाचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7 अ, 12 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Kailas Jaywant kodag(I (Inspector)) / PNMAH52874 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली**.)**

**R.O.A.C.(**आर**.** ओ **.**ए **.**सी**.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Kailas Jaywant koda

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** PNMAH52874

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**